शब्दांना सत्याची धार

# प्रहार

RANE PRAKASHAN PRIVATE LIMITED



पश्चिम द्रुतगती मार्ग ते बीकेसी उन्नत मार्गिका

पान : मुंबई



राजा मुथुपांडीची रौप्यमय झेप

पान : क्रीडा

मुंबई ● मंगळवार, २८ जुलै २०२६ | मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, नाशिक येथून एकाचवेळी प्रसिद्ध ● वर्ष २२ ● अंक २९० ● पाने १० ● ₹ ५.०० | www.prahaar.in epaper.prahaar.in

# परीक्षा विधेयकावर आज चर्चा ?

## संसदीय कोंडीनंतर सर्वपक्षीय सहमती; लोकसभा अध्यक्षांचा पुढाकार

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

'सार्वजनिक परीक्षा (गैरव्यवहार प्रतिबंधक) संशोधन विधेयक, २०२६' वरून संसदेत निर्माण झालेली कोंडी लवकरच सुटण्याची चिन्हे आहेत. या विधेयकावर मंगळवारी सविस्तर चर्चा सुरू करण्यास सर्व प्रमुख राजकीय पक्ष सहमत झाले आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. याआधी विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेची दोन्ही सभागृहे दिवसभरासाठी तहकूब करावी लागली होती.

देशातील स्पर्धा परीक्षा प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी सर्वपक्षीय एकजूट महत्त्वाची असल्याचे सांगत, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी या विधेयकावर सर्वसमावेशक चर्चेसाठी विशेष सहा तासांचा अवधी देण्याचा प्रस्ताव ठेवला होता. लोकसभा अध्यक्षांच्या या पुढाकारानंतर आणि विविध पक्षांच्या गटनेत्यांसोबत झालेल्या चर्चेला सकारात्मक यश मिळाले आहे. त्यानुसार, सत्ताधारी आणि विरोधक मंगळवारी या विधेयकावर सविस्तर चर्चा करण्यास तयार झाले आहेत.

नीट-युजी प्रश्नपत्रिकाफुटीविरुद्ध देशव्यापी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक आणले गेले असून, याद्वारे परीक्षांमधील पेपरफुटी, गैरव्यवहार आणि परीक्षा माफियांचे रॅकेट प्रभावीपणे रोखण्याचा उद्देश आहे. हे विधेयक केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी संसदेत मांडले होते. या संशोधन विधेयकानुसार गुन्हेगारांसाठीची शिक्षा ५ वर्षांवरून वाढवून "५ ते १० वर्षे" करण्यात आली असून, ५० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. संघटित गुन्हेगारीसाठी किमान ५ वर्षांच्या शिक्षेऐवजी किमान ७ वर्षांची शिक्षा आणि १० कोटी रुपयांपर्यंतचा दंड प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच या कायद्यांतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांच्या खटल्यांसाठी विशेष जलद गती न्यायालये स्थापन करण्याची तरतूद आहे.



### कठोर तरतुदी

■ परीक्षांमधील गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी हे विधेयक केंद्रीय मंत्री डॉ. जितेन्द्र सिंह यांनी संसदेच्या पटलावर मांडले. या सुधारणा विधेयकानुसार परीक्षांमधील गैरव्यवहार रोखण्यासाठी शिक्षेच्या आणि दंडाच्या अत्यंत तरतुदी कठोर केल्या आहेत.

# संसद मोर्चातील हिंसाचारात ९८९ सराईत गुन्हेगारांचा सहभाग

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

गेल्या सोमवारी संसदेकडे काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान झालेल्या हिंसाचारात गंभीर गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या शेकडो व्यक्ती सहभागी असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दिल्ली पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हिंसाचार आणि पोलिसांवरील हल्ल्यात सहभागी असलेल्या २,८७३ जणांची ओळख पटवली असून, त्यापैकी ९८९ जणांचा गंभीर गुन्हेगारी इतिहास असल्याचे उघड झाले आहे.

दिल्ली पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंसाचारात सहभागी असलेल्या व्यक्तींविरुद्ध विविध प्रकारचे गंभीर गुन्हे दाखल आहेत. १०१ जणांवर खुनाचे गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी ४२ जणांवर दोन किंवा त्यापेक्षा अधिक खुनाचे गुन्हे असून, १२ जणांवर दहा किंवा त्याहून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे, तर २८४ जण दरोडा आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्ये आरोपी आहेत. त्यापैकी १५५ जणांवर एकापेक्षा अधिक गुन्हे दाखल असून, ३१ जणांवर दहा किंवा त्याहून अधिक गुन्ह्यांची नोंद आहे. महिला आणि बालकांवरील अत्याचार तसेच अन्य संबंधित गुन्ह्यांतील ९२ आरोपी या हिंसाचारात सहभागी होते. २२९ जणांवर शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हे दाखल आहेत. यातील ६७ जणांवर अमली पदार्थविरोधी कायद्यांतर्गत गुन्ह्यांची नोंद आहे, तर १३५ जण जबरी चोरी आणि १९ जण अपहरणाच्या गुन्ह्यांत आरोपी आहेत.

# 'नीट'च्या आंदोलनाआडून 'गज्वा-ए-हिंद'चा प्रयत्न?

## मंत्री नितेश राणे यांचा सवाल; कायदा व सुव्यवस्था बिघडवण्यासाठी 'डीपफेक'चा वापर

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

कॉक्रोच जनता पार्टी आणि विद्यार्थ्यांच्या आंदोलनांचा गैरफायदा घेत महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था बिघडवण्यासाठी देशाबाहेरून मोठे षडयंत्र रचले जात असल्याचे वास्तव समोर आले आहे. या आंदोलनांच्या आडून 'गज्वा-ए-हिंद' घडवण्याचा प्रयत्न सुरू आहे का, असा सवाल मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी सोशल मीडियावरून उपस्थित केला आहे.

दुसरीकडे, जनमानसात भ्रम निर्माण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या ५०० हून अधिक संशयित सोशल मीडिया अकाऊंट्सची ओळख



महाराष्ट्र सायबर विभागाने पटवली असून त्यांच्यावर कारवाई सुरू केली आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा धोक्यात आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरून अपप्रचार केला जात असल्याची माहिती सायबर विभागाच्या अप्पर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. या तपासासाठी 'ओपन-सोर्स इंटेलिजन्स' (ओएसआयएनटी), डेटा मेटाडेटा विश्लेषण आणि अत्याधुनिक एआय फॉरेन्सिक उपकरणांचा वापर करण्यात आला. या विश्लेषणादरम्यान, विशिष्ट उद्देशाने प्रेरित होऊन महाराष्ट्रातील शांतता भंग करण्याच्या हेतूने चालवले जाणारे एक संघटित नेटवर्क सायबर पोलिसांच्या हाती लागले आहे. तांत्रिक तपासात निष्पन्न झालेल्या माहितीनुसार, या अपप्रचाराची सूत्रे प्रामुख्याने भारताबाहेरून हलवली जात होती. ओळख पटवलेल्या १०० हून अधिक सोशल मीडिया हँडल्स हे पाकिस्तान आणि मध्य पूर्वेतील काही देशांमधून चालवले जात असल्याचे उघड झाले आहे. या नेटवर्कद्वारे चालवल्या जाणाऱ्या ४२९ अति-आक्षेपार्ह पोस्ट्स इंस्टाग्राम, एक्स, फेसबुक आणि यूट्यूबवरून हटवण्यासाठी संबंधित कंपन्यांशी संपर्क साधून कारवाई सुरू केली आहे.

# धर्मेंद्र प्रधान यांचे संसदेत जंगी स्वागत

## सत्ताधारी खासदारांकडून कौतुक



◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा दिल्यानंतर धर्मेंद्र प्रधान हे सोमवारी पहिल्यांदाच संसदेत पोहोचले. यावेळी संसद भवन परिसरात भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या खासदारांनी त्यांचे अत्यंत उत्साहात आणि जंगी स्वागत केले. मकरद्वाराजवळ जमलेल्या सत्ताधारी खासदारांनी 'धर्मेंद्र प्रधान जिंदाबाद' अशा घोषणा देत त्यांच्या देशहिताच्या निर्णयाचे समर्थन केले. तसेच त्यांना पारंपरिक 'पाग' (फेटा) घालून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

काही राजकीय विरोधक या राजीनाम्यावरून दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत असले, तरी वस्तुस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. कोणत्याही दबावाखाली किंवा असंतोषामुळे हा राजीनामा घेतलेला नाही. उलट, देशातील विद्यार्थ्यांच्या हितसंबंधांना आणि लोकभावनांना सर्वोच्च प्राधान्य देत धर्मेंद्र प्रधान यांनी स्वतःहून अंतरात्म्याचा आवाज ऐकून स्वेच्छेने पद सोडण्याचा उदात्त निर्णय घेतला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्याकडे राजीनामा मागितलेला नव्हता, मात्र एका जबाबदार नेत्याप्रमाणे त्यांनी हा त्याग केला.

भाजपने यातून स्पष्ट संदेश दिला आहे की, पक्ष आणि सरकार संपूर्णपणे प्रधान यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. संकटसमयी नेत्याच्या पाठीशी खंबीर राहण्याची पक्षाची संस्कृती या स्वागत सोहळ्यातून दिसून आली. सरकारने जनभावनांचा आणि नैतिक मूल्यांचा आदर करून एक आदर्श पायंडा पाडला आहे. या संपूर्ण घटनाक्रमातून विरोधकांच्या राजकारणाला चोख प्रत्युत्तर देत भाजपने आपल्या नेतृत्वावरील निष्ठा आणि पारदर्शकता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे.

# आंदोलनादरम्यान गोळीबार करणाऱ्या पोलिसाचे निलंबन

◆ **सिवान (वृत्तसंस्था) :**

बिहारमध्ये आंदोलनादरम्यान गोळीबार करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यावर प्रशासनाने तत्काळ निलंबनाची कारवाई केली आहे. सिवानचे जिल्हा दंडाधिकारी विवेक रंजन मैत्रेय आणि पोलीस अधीक्षक पूरण कुमार झा यांनी सोमवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. कॉन्स्टेबल अभिषेक कुमार असे निलंबित करण्यात आलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव असून, त्याच्यावर विभागीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रशासनाने स्पष्ट केले की, संबंधित कॉन्स्टेबल हा जिल्हा गुप्तचर पथकाचा भाग होता आणि एका हत्येच्या तपासासाठी जात असताना तो आंदोलकांच्या गर्दीत अडकला होता. गोंधळात अडकल्यानंतर त्याने हवेत चार राऊंड फायर केले. हा गोळीबार अनधिकृत होता, असे विवेक रंजन मैत्रेय यांनी स्पष्ट केले. एसपी पूरण कुमार झा यांनी सांगितले की, या गोळीबारात कोणीही जखमी झाले नाही; परंतु सुरक्षेच्या कारणास्तव कारवाई केली आहे. तसेच, गोळीबार झालेल्या ठिकाणापासून दूर अंतरावर असलेले मोहम्मद आरिफ (वय १७), आकाश कुमार (वय २२) आणि बुलेट कुमार गौर (वय २०) हे तीन तरुण जखमी आढळले होते. डॉक्टरांनी जखमींची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे घोषित केले.

## वेचक

### अमेरिकेत गोळीबारात दोघांचा मृत्यू

**वॉशिंग्टन :** अमेरिकेतील सिएटल येथे प्रसिद्ध 'बाइट ऑफ सिएटल' फूड फेस्टिवलदरम्यान रविवारी संध्याकाळी झालेल्या अंधाधुंद गोळीबारामध्ये दोन जण जागीच ठार झाले, तर दोन वर्षांच्या बालकासह इतर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. या दुर्घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी धावपळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले. सिएटल सेंटर परिसरातील 'स्पेस नीडल' जवळ रविवारी संध्याकाळी सुमारे ६ वाजता अचानक झालेल्या गोळीबाराच्या आवाजामुळे सुरुवातीला लोकांना फटाके फुटल्याचा भास झाला, मात्र काही क्षणातच झालेल्या चेंगराचेंगरीत आणि भगदडीत लोकांनी जीव वाचवण्यासाठी दुकाने व इमारतींमध्ये आश्रय घेतला. या हल्ल्यात मृत पावलेल्या दोन जणांची ओळख अद्याप पटलेली नाही.

### 'नॅशनल हेराल्ड'ची सुनावणी लांबणीवर

**नवी दिल्ली :** मनी लाँड्रिंग प्रकरणात सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांविरुद्धच्या आरोपपत्राची दखल घेण्यास कनिष्ठ न्यायालयाने नकार दिला होता. या निर्णयाला आव्हान देणाऱ्या ईडीच्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी दिल्ली उच्च न्यायालयाने सोमवारी त्यांना तीन आठवड्यांची मुदत दिली असून, पुढील सुनावणी १० सप्टेंबर रोजी होणार आहे. 'नॅशनल हेरॉल्ड' 'यंग इंडियन' कंपनीकडे हस्तांतरित केले. या व्यवहारात मनी लाँड्रिंग झाल्याचा आरोप करत ईडीने चौकशी सुरू केली आहे.

# औषध निरीक्षक भरती परीक्षा प्रकरणाला वळण

## खोटी तक्रार केल्याचे तक्रारदाराचेच पत्र

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या औषध निरीक्षक भरती प्रक्रियेतील कथित पेपरफुटी प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याची तक्रार करणाऱ्या व्यक्तीनेच ती तक्रार बनावट असल्याचा ई-मेल केल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित परीक्षा पुन्हा व्हावी यासाठीच हा बनाव रचल्याचे तक्रारदाराने दुसऱ्या ई-मेलमध्ये म्हटल्याची चर्चा आहे.

एमपीएससीतर्फे २२ मार्च २०२६ रोजी औषध निरीक्षक भरतीची लेखी परीक्षा घेण्यात आली होती. १२ जून रोजी या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यानंतर १ ते २१ जुलै या कालावधीत यशस्वी उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या आणि २२ जुलै रोजी अंतिम निवड यादी प्रसिद्ध केली. मात्र, निवड यादी जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, म्हणजेच २३ जुलै रोजी एमपीएससीला ई-मेलद्वारे एक तक्रार प्राप्त झाली. परीक्षेपूर्वी काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे व्हॉट्सॲपवर व्हायरल झाल्याचा, तसेच काही उमेदवारांचे गुण संशयास्पदरीत्या वाढल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला होता. तक्रारदाराने व्हॉट्सॲप चॅट, कॉल रेकॉर्ड्स आणि डिजिटल पुराव्यांच्या आधारे अन्न व औषध प्रशासनाकडे फॉरेन्सिक तपासाची मागणीही केली होती.

तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन एमपीएससीने तात्काळ पावले उचलत तक्रारदाराला सर्व उपलब्ध पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच, संबंधित संशयित उमेदवार आणि तक्रारदाराला प्रत्यक्ष चौकशीसाठी आयोगासमोर हजर राहण्याचे आदेश देण्यात आले. या सर्वांच्या जबाबांच्या आधारे पुढील कारवाई निश्चित केली जाणार होती.

तक्रारीवर चौकशी सुरू असतानाच, गुरुवारी रात्री या प्रकरणात नाट्यमय घडामोडी घडल्या. तक्रारदाराने एमपीएससीला आणखी एक ई-मेल पाठवून आपली पूर्वीची तक्रार बनावट असल्याचे कळवले. "जवळच्या काळात पुन्हा परीक्षा होण्याची शक्यता नसल्याने, जुनी परीक्षा रद्द करून ती पुन्हा घेतली जावी यासाठीच हा बनाव रचला होता," अशी कबुली तक्रारदाराने या ई-मेलमध्ये दिल्याची माहिती एमपीएससीतील सूत्रांनी दिली आहे.

# बँक ऑफ बडोदाचा १ टीबी डेटा चोरीला

## ग्राहकांची माहिती, वैयक्तिक तपशील आणि कागदपत्रे डार्क वेबवर

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

'बँक ऑफ बडोदा'चा तब्बल १ टीबी इतका प्रचंड आणि संवेदनशील डेटा चोरीला गेला आहे. हा सर्व चोरलेला डेटा आता डार्क वेबवर मोफत उपलब्ध करून देण्यात आला असून, यामध्ये बँक ग्राहकांची वैयक्तिक माहिती, खात्यांचे तपशील आणि अंतर्गत कागदपत्रांचा समावेश असल्याची माहिती मिळत आहे.

हॅकर्सनी केलेल्या दाव्यानुसार, या १ टीबीच्या डेटाबेसमध्ये बँक ग्राहकांची संवेदनशील माहिती समाविष्ट आहे. यात प्रामुख्याने बचत खाती आणि चालू खात्यांचे सर्व रेकॉर्ड, ग्राहकांची कर्जाची माहिती आणि अर्ज, नेट बँकिंग युजरचे तपशील आणि वैयक्तिक ओळख





कागदपत्रे, अनिवासी भारतीय आणि कॉर्पोरेट बँकिंग सेवांचे गोपनीय रेकॉर्ड, देशभरातील बँक शाखा आणि एटीएमशी संबंधित अंतर्गत कागदपत्रे आणि अहवाल याचा समावेश आहे. हा संपूर्ण डेटा सर्वप्रथम गेल्या शनिवार, म्हणजेच २६ जुलै रोजी 'ransom-ware.live' या डार्क वेब ट्रॅकिंग करणाऱ्या वेबसाईटवर निदर्शनास आला होता. त्यानंतर सायबर सुरक्षा वर्तुळात खळबळ उडाली आहे. सध्या तरी कुणीही या हल्ल्याची जाहीरपणे जबाबदारी स्वीकारलेली नाही. मात्र, 'ट्रिपलएक्स' नावाच्या हॅकिंग ग्रुपचा यामागे हात असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

### बँकेचे स्पष्टीकरण

बँक ऑफ बडोदने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर आपले अधिकृत स्पष्टीकरण जारी केले आहे. बँक ऑफ बडोदने स्पष्ट केले आहे की, त्यांची मुख्य बँकिंग सिस्टीम पूर्णपणे सुरक्षित आहे. एका कर्मचाऱ्याचे ईमेल हॅक झाल्यामुळे हा डेटा लीक झाला. बँकेने तातडीने सुरक्षा उपाययोजना केल्या आहेत.

# दहा वर्षांनंतर नेपाळमध्ये भारतीय नोटांना परवानगी

◆ **काठमांडू (वृत्तसंस्था):**

नेपाळ सरकारने त्यांच्या नागरिकांना २०० आणि ५०० रुपयांच्या भारतीय नोटा देशात बाळगण्याची परवानगी दिली आहे. २०१६ मधील नोटाबंदीनंतर केवळ १०० रुपयांपर्यंतच्या नोटांना परवानगी देण्यात आली होती. आता नेपाळ राष्ट्र बँकेने जारी केलेल्या नव्या सूचनेनुसार, नागरिक ९ नोव्हेंबर २०१६ नंतर जारी केलेल्या २०० आणि ५०० रुपयांच्या नोटा प्रति व्यक्ती २५,००० रुपयांच्या मर्यादेपर्यंत सोबत बाळगू शकतात. मात्र, नागरिक भारताव्यतिरिक्त इतर कोणत्याही देशातून नेपाळमध्ये भारतीय चलन आणू शकत नाहीत.

# राज्यात 'ऑर्केस्ट्रा बार'चे परवाने बंद!

## गृह विभागाचा निर्णय; जुन्या परवान्यांचे नूतनीकरणही थांबवले

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

हॉटेल, उपाहारगृहे आणि बारमधील अश्लील नृत्यांवर बंदी घालणाऱ्या कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन 'ऑर्केस्ट्रा'च्या नावाखाली सुरू असणाऱ्या गैरप्रकारांना चाप लावण्यासाठी गृह विभागाने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. यापुढे राज्यात 'महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१' अंतर्गत ऑर्केस्ट्रासाठी नवीन परवाने दिले जाणार नाहीत, तसेच जुन्या परवान्यांचे नूतनीकरणही केले जाणार नाही, असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गृह विभागाने सोमवारी यासंदर्भातील परिपत्रक जारी करून सर्व पोलीस यंत्रणांना कठोर अंमलबजावणीचे निर्देश दिले आहेत.

राज्यात 'महाराष्ट्र हॉटेल, उपाहारगृहे आणि मद्यपान कक्ष (बार रूम) मधील अश्लील नृत्यांवर बंदी घालण्याबाबत व महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २०१६' लागू झाल्यानंतर डान्स बारवर कठोर निर्बंध आले होते. मात्र, या नियमांमधून सुटका करून घेण्यासाठी अनेक आस्थापनांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील 'सार्वजनिक मनोरंजन नियमावली'चा गैरवापर



करत 'ऑर्केस्ट्रा' (प्रत्यक्ष संगीत सादरीकरण) परवाने मिळवण्याचा मार्ग निवडला होता. या परवान्यांच्या आड पुन्हा अश्लील नृत्य आणि इतर गैरप्रकार सुरू असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते.

### पोलीस यंत्रणांना कठोर अंमलबजावणीचे आदेश

गृह विभागाच्या सहसचिव मुग्धा धुरी यांच्या स्वाक्षरीने राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक आणि जिल्हादंडाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. यापुढे पोलीस अधिनियमांतर्गत ऑर्केस्ट्राचे कोणतेही नवीन परवाने मंजूर केले जाणार नाहीत आणि जुन्या परवान्यांची मुदत संपल्यानंतर नूतनीकरण केले जाणार नाही, असे त्यात स्पष्ट केले आहे.

# दुबईहून मुंबईला येणाऱ्या इंडिगोच्या विमानात धूर

## राजकोट विमानतळावर सुरक्षित आपत्कालीन लँडिंग





◆ **राजकोट (वृत्तसंस्था) :**

दुबईहून मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या इंडिगोच्या एका विमानामध्ये अचानक धूर दिसून आल्याने खळबळ उडाली. खबरदारीचा उपाय म्हणून या विमानाचे गुजरातच्या राजकोट विमानतळावर यशस्वी आणि सुरक्षित आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. या घटनेत विमानावरील सर्व प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

प्राप्त माहितीनुसार, इंडिगोचे विमान (आयजीओ १४५२) दुबईहून मुंबईसाठी झेपावले होते. या विमानात एकूण १९४ प्रवासी प्रवास करत होते. विमान प्रवासात असतानाच अचानक त्याच्या 'कार्गो होल्ड' भागात धूर आढळून आला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन वैमानिकाने तातडीने विमान राजकोट विमानतळाकडे वळवण्याचा निर्णय घेतला.

राजकोट विमानतळाचे संचालक दिगंत बोरा यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, "विमानाच्या कार्गो कंपार्टमेंटमध्ये धूर निघत असल्याचे लक्षात आल्यानंतर दुपारी २.४५ वाजता विमानतळावर आपत्कालीन स्थिती घोषित केली.

### राजकोट विमानतळावर आणीबाणी घोषित

राजकोट आंतरराष्ट्रीय विमानतळावर आणीबाणी जाहीर केली. विमानतळाच्या धावपट्टीवर आपत्कालीन सुरक्षा प्रोटोकॉल सक्रिय केले. अग्निशमन दलाच्या गाड्या, पाण्याचे टँकर, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचे पथक, तसेच अनेक रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवली होती.

# शांततापूर्ण निदर्शने हा संविधानाने दिलेला अधिकार

## सर्वोच्च न्यायालयाची महत्त्वाची टिप्पणी; विद्यार्थी आंदोलकांवर केलेला लाठीमार अमान्य

◆ **नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी २० जुलै रोजी संसदेवर काढण्यात आलेल्या मोर्चादरम्यान परिस्थिती अत्यंत चिघळली आणि पोलिसांनी केलेल्या लाठीमारामध्ये अनेक आंदोलक विद्यार्थी तसेच काही पोलीस कर्मचारी जखमी झाले होते. या संपूर्ण प्रकरणाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने आंदोलकांवरील पोलिसांच्या कारवाईवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत.



### पोलिसांसाठी निश्चित कार्यपद्धती हवी

**अशा प्रकारच्या मोठ्या आणि संवेदनशील आंदोलनांना सामोरे जाताना पोलिसांसाठी पुरेशी सुरक्षा व्यवस्था आणि निश्चित कार्यपद्धती का करण्यात आली नव्हती, असा सवालही खंडपीठाने उपस्थित केला. न्यायालयाने पुढे निरीक्षण नोंदवले की, "समजा तरुणांना किंवा विद्यार्थ्यांना एखाद्या महत्त्वाच्या मुद्द्यावर आपला रोष व्यक्त करायचा असेल, तर त्यांना लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे.**

आंदोलकांवर झालेल्या लाठीमारविरोधात दाखल करण्यात आलेल्या याचिकांवर सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने या सुनावणीदरम्यान अत्यंत महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली. खंडपीठाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, "शांततापूर्ण निदर्शने करणे हा भारतीय संविधानाने नागरिकांना दिलेला मूलभूत अधिकार आहे. जोपर्यंत आंदोलन शांततापूर्ण मार्गाने सुरू आहे, तोपर्यंत हा अधिकार कोणालाही नाकारता येणार नाही. केवळ आंदोलन सुरू आहे म्हणून पोलिसांकडून बळाचा अतिवापर किंवा हिंसक कारवाई करण्याचे समर्थन कधीही केले जाऊ शकत नाही." विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून बळाचा अतिवापर करण्यात आल्याचा आरोप करणाऱ्या याचिकांवर सुनावणी करताना, पोलिसांनी केलेल्या अतिरिक्त कारवाईच्या आरोपांची स्वतंत्रपणे तपासणी व चौकशी झालीच पाहिजे, असे निर्देश न्यायालयाने दिले.

# विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांसाठी ९ ऑगस्टला मुंबईत मोर्चा

◆ **मुंबई (प्रतिनिधी) :**

नीट पेपरफुटी प्रकरणातील तीव्र आंदोलनानंतर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला असून दिल्लीतील आंदोलन मागे घेण्यात आले असले, तरी महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी संघर्षाची धग कायम आहे. आगामी ९ ऑगस्ट रोजी 'क्रांती दिन'चे औचित्य साधत मुंबईत विविध विद्यार्थी संघटनांच्या वतीने भव्य रॅली काढण्यात येणार आहे. नीट परीक्षेतील पारदर्शकता, टीईटी व एमपीएससी पेपरफुटीचे प्रश्न आणि मराठी शाळांच्या समस्येवर या माध्यमातून आवाज उठवला जाईल. कॉक्रोच जनता पार्टी, छात्र भारती, एआयएसएफ आणि एसएफआय यांसारख्या प्रमुख संघटना एकत्र येऊन ही चळवळ पुढे नेणार आहेत.